मजकुर :—

दिनांक ०३/०९/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **Best Detection of the Month** माहे जुलै २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जलै— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | कफ परेड पोलीस ठाणे परिमंडळ — ०१ | गु.र.क्र. २९३/२१, कलम ३०२, ३७६ (ड) (ब), ३६३, २०१, ३४ भा.दं.वि. सह कलम ४, ६, ८, १० लैगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ |

—: ‘ अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून खून ’ :—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— दिनांक ०९/०७/२०२१ रोजी रात्रो ०१.०० वा. च्या सुमारास फिर्यादी यांनी त्यांची मुलगी आर्या सचिन चितकोटे, वय ०३ महिने हिला दुध पाजण्यासाठी पाहिले असता ती दिसली नाही म्हणुन त्या राहत असलेले परिसारात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. म्हणुन फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतुन कोणीतरी तिला पळवून नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती. ज्योत्स्ना सचिन चितकोटे वय २८ वर्ष, |
| बळीत | :— | कुमारी आर्या सचिन चितकोटे, वय ०३ महिने |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) कन्हैय्या उर्फ कन्नु दत्ता चौगुले वय २२ वर्षे,<br>२) सोनु मनोज काळे वय २० वर्षे,<br>आरोपी क्र. १ अटक दिनांक ०९/०७/२१ रोजी<br>आरोपी क्र. २ अटक दि. ०९/०७/२०२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने मा. अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि. मुंबई, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई व मा. सपोआ कुलाबा विभाग, मुंबई यांनी गुन्हयाच्या घटनास्थळी भेट दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली यातील फिर्यादी हिच्याकडे तपासाच्या दृष्टीकोनातुन चौकशी केली असता कफ परेड परिसरात नेहमी बधाई मागणारा तृतीय पंथी कन्नु हा दि. ०८/०७/२०२१ रोजी २०.३० ते २१.०० वाच्या सुमारास त्याचे घराजवळ बधाई मागण्याकरीता आला होता. त्यास बधाई न दिल्यामुळे तो रागाने निघुन गेला असल्याची माहिती प्राप्त केली.

नमुद तृतीय पंथीयाचा शोघ घेण्याकरीता गुन्हे प्रकटीकरण पथकास रवाना करण्यात आले. गून्हे प्रकटीकरण पथकाने गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशिर माहिती प्राप्त करून आरोपीचा ठावठिकाना शोधुन त्यास ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस आणले. त्याचेकडे गुन्हयाच्या अनषंगाने कसुन चौकशी केली असता त्याने त्याचा साथीदार सोनु काळे, याचेसोबत मिळुन सदर गुन्हा केला असल्याचे कबुल केले. त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. अटक आरोपी याने स्व:इच्छेने त्याच्या साथीदारासोबत त्याने नमुद गुन्हयातील लहान मुलीस गाडलेली जागा दाखवितो असे निवेदन केल्याने दोन पंचासमक्ष त्यांने दाखविलेल्या समुद्राच्या खाडीतील दलदलीतुन लहान मुलीस तात्काळ काढुन, तिस जे.जे. रूग्णालय नेण्यात आले. जे.जे. रूग्णालय येथे गेले असता, डॉक्टरांनी बळीत मुलीस तपासुन १४.२५ वा सुमारास मयत घोषीत केले. त्यामुळे सदरच्या गुन्हयात भादंवि कलम ३०२, २०१, ३४ असे वाढ करण्यात आली.

गुन्हयातील मयत लहान मुलगी आर्या सचिन चितकोटी वय ३ महिने हिच्या मृतदेहाचा दोन पंचासमक्ष इन्क्वेस्ट पंचनामा करण्यात आला. बळीताच्या प्रोव्हिजनल डेथ ऑफ सर्टिफिकेट मध्ये मरणाचे कारण DROWNING WITH GENITAL INJURIES ( UN-NATURAL) असे नमुद केले आहे.

यातील अटक आरोपी कन्हैय्या उर्फ कन्नु दत्ता चौगुले वय २२ वर्षे (तृतीय पंथ), याने

त्याच्या अटक पंचनाम्यात त्याचा साथीदार सोबत मिळुन गुन्हा केला असल्याचे नमुद केले. त्यानुसार तपासी पथकाने आरोपीचा साथीदार सोनु मनोज काळे, याचा शोध घेवुन त्यास पोलीस ठाणेस आणुन चौकशी केली असता त्याचा गुन्हयात सहभाग निष्पन्न झालेने त्यास नमुद गुन्हयात अटक केली.

यातील मयत मुलगी कु. आर्या सचिन चितकोटे हिचे दि. ०९/०७/२०२१ रोजी सर जे.जे. रूग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात आले होते. त्यानुसार अंतीम अहवाल (पी.एम.नोट) प्राप्त झाले असुन त्यात कॉलम क्र. १५ मध्ये lacerated wound over vagina at 7 o'clock position. Laceration at size 3cm × 2cm× muscle deeps at 7 o'clock position involving labia minora with perineal tear margins irregular infiltrated with blood surrounding area swollen with blood stains over labia majora.असे नमुद असल्याने वर्णनानुसार गुन्हयात कलम ३७६(ड) (ब), भा.दं.वि. सह कलम ४, ६, ८, १० लैगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम २०१२ अशी वाढ करण्यात आली.

सदर गुन्हयातील आरोपीतांनी गुन्हयातील अल्पवयीन बळीत मुलगी कुमारी आर्या सचिन चितकोटे, वय ०३ महिने हिस फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार करून तिला जिवंत गाडण्यात आले होते. त्यामुळे परिसरातील लोकांमध्ये जन आक्रोश निर्माण होऊन पोलीस ठाणे समोर मोठया प्रमाणात जमाव जमला होता. अशा परिस्थीतीत तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय उत्कृष्ठपणे परिस्थीती हाताळुन, त्यांच्या कौशल्याचा वापर करुन सदरचा गुन्हा हा १२ तासात उघडकीस आणुन गुन्हयातील दोन्ही आरोपीताना अटक केली. हि बाब प्रशसनिय व उल्लेखनिय आहे.

### कांदीवली पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. राजकुमार डोंगरे | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. विकास म्हामुणकर | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. कुणाल अर्जुन रुपवते | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. विशाल विलास गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री. विकास मनोहर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | श्री. तौसिफ रसुल मुल्ला | प्रशस्तीपत्रक |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | श्री. दिनकर दादा इलग | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पोलीस उप निरीक्षक | श्री. विक्रम तुकाराम ताकमोगे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ह.क्र. २९९१२ | श्री. आबासाहेब बापुराव सुर्यवंशी | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ह.क्र. ९७०५९० | श्री. वसंत तुकाराम महाले | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र. ०३०७८९ | श्री. प्रकाश दुर्गप्पा जाधव | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र. ०६०९२३ | श्री. किशोर देवीदास राठोड | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०६१५९७ | श्री. विनायक पुंडलीक भालेराव | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.शि.क्र. ००५५४ | श्री. संदिप हरिचंद्र तांडेल | प्रशस्तीपत्रक |

| ०२ | दहिसर पोलीस ठाणे<br>परिमंडळ — १२ | गु.र.क्र. ८९१/२१,कलम ४५२, ३९६, ३९७, ३०२, ३४, १२०—ब भादवि सह कलम ३,२५,२७ भा.ह.का सह ३७(१)(अ), १३५ मपोका |
|---|---|---|

—: ' अग्निशस्त्राच्या दाखवुन दरोडा सह खुन.' :—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— दिनांक ३०.०६.२०२१ रोजी गावडे नगर, रावळपाडा, दहिसर पुर्व मुंबई येथील ओम साई राज ज्वेलर्स या सोन्या चांदीच्या दागिन्यांच्या दुकानाचे मालक श्री. शैलेंद्र रमाकांत पांडे, वय ४० वर्षे हे नियमित काम करीत होते. सदरवेळी तीन अनोळखी इसमांनी दुकानात शिरुन त्यांच्याकडील अग्नीशस्त्रातुन दुकान मालक यांच्या दिशेने गोळया झाडुन त्यांना गंभीर जखमी केले. तसेच दुकानातील अंदाजे ३० ते ३५ तोळे सोन्याचे दागिने किंमत अंदाजे रु. १७ लाखा ची जबरी चोरी केली. जखमी दुकान मालक यांना उपचारार्थ रुग्णालयात आणले असता त्यांना दाखलपुर्व मयत घोषित करण्यात आले. म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. धिरज बद्रीनारायण पांडे, वय ३२ वर्षे. |
| बळीत | :— | श्री. शैलेंद्र रमाकांत पांडे वय ४० वर्षे |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :— | साधारण ३० ते ३५ तोळे सोन्याचे दागिने कि. अं. रू १७,००,०००/— |
| हसतगत केलेली मालमत्ता | :— | १) ३५१.४१ ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचे दागिने<br>२) अटक आरोपींचे ०७ मोबाईल हॅडसेट<br>३) एक लोखंडी धातुचे देशी बनावटीचे पिस्तुल व एकुण ४ नग पितळी जिवंत काडतुसे<br>४) ०३ रिकाम्या पुंगळया<br>५) ०१ बुलेटचा तुकडा<br>६) एक करडया रंगाची होंडा सिटी मो. कार क्र. MH-01-AL-4323<br>७) एक काळया रंगाची ॲक्टीव्हा मो. स्कूटर क्र. MH-02-CS-4535 |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) आयुष संजय पांडे, वय— १९ वर्षे,<br>२) निखील मानकजी चंडाल,<br>३) उदय संजय बाली, वय— २१ वर्षे,<br>४) चिराग इंदरमल रावल<br>५) अंकित संजय महाडीक,<br>६) बंटी गुलाबचंद पाटीदार<br>७) प्रमोद जगदीश हाटडिया, |

**तपास कौशल्य :—** गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळी वरिष्ठांनी भेट देऊन त्यांच्या मार्गदर्शनाखाली एकुण ११ पथके तयार करण्यात आली. प्रत्येक पथकाला त्यांनी वेगवेगळी कामगीरी दिली. गुन्हयाच्या घटनास्थळी तसेच आजुबाजुला सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी करुन गुन्हयातील तिन अनोळखी इसमांची छायाचित्रे मिळविण्यात आली. सदरची छायाचित्रे प्रसारीत करून आरोपींचा शोध घेण्याची मोहीम तात्काळ राबविण्यात आली.

गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने मिळालेल्या आरोपींच्या छायाचित्रांचा अभ्यास करीत असताना सपोनि घार्गे, पोशि ०९०६२१/हिरेमठ यांच्या असे लक्षात आले की, दिनांक २९/०६/२०२१ रोजी दहिसर पोलीस ठाणेच्या हद्दीतुन एनरोज बिल्डींग जवळुन चोरी झालेल्या ॲक्टीवा मो/स्कुटरच्या गुन्हयातील पाहिजे आरोपी आणि ज्वेलर्सच्या दुकानात फायरिंग करणाऱ्या तिन आरोपींपैकी एक आरोपी हा एकच असल्याचे लक्षात आले.

सदरवरुन तपासी पथकाने दिनांक २९/०६/२०२१ रोजीच्या मो/स्कुटर चोरीच्या घटनास्थळी पुन्हा एकदा भेट देवुन सदरच्या ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. सदरच्या पाहणीत असे निष्पन्न झाले की, मो/स्कुटर चोरी करणारा आरोपी व ज्वेलर्सच्या दुकानात फायरिंग करुन लुट करणारा आरोपी व त्याचे साथीदार हे एकच आहेत. घटनास्थळी बारकाईने पाहणी केली असता, एकुण ०५ आरोपीतांनी एक

होंडा सिटी कार वापरुन फायरिंगचा गुन्हा करण्यासाठी एक मो/स्कुटर चोरली व त्या मो/स्कुटरचा वापरकरुन ज्वेलर्सच्या दुकानात लुट करुन पळुन गेले.

तात्काळ गुन्हयात वापरलेल्या मो/कारचा क्रमांक हा वेगवेगळया एकुण १७ सीसीटीव्ही फुटेजमधुन प्राप्त करण्यात आला. कारच्या मालकाचा शोध घेवुन त्याचेकडे मो/कारबाबत विचारणा केली असता, त्याने सदर मो/कार ही १५ दिवसापुर्वी इसम नामे—चिराग इंदरमल रावल, यास विक्री केल्याचे सांगितले. सदरचा गुन्हा हा चिराग रावल व त्याचा साथीदार अकित महाडीक, तसेच इंदौर येथील राहणारे उदय बाली, आयुश पांडे, निखील चंडाल, बंटी पाटीदार व प्रमोद हाटडीया यांनी मिळुन केल्याचे प्रथम दर्शनी निष्पन्न केले. अशा प्रकारे गुन्हा घडल्यानंतर अवघ्या सहा तासात पोलीस पथकाने अथक परिश्रमानंतर आरोपी निष्पन्न केले. गुन्हयातील पाहिजे ०५ आरोपी हे बारबोधन, सुरत, राज्य गुजरात येथे असल्याचे तांत्रिक तपासावरुन निष्पन्न केले. पाहिजे आरोपी हे इंदौर येथे राहणारे असल्याने त्यांचा शोध सुरत तसेच इंदौर येथे घेण्यासाठी एकुण १६ अंमलदार व ०४ अधिकारी यांची चार पथके तयार करुन आरोपींचा शोध घेण्याकरीता रवाना केले.

तपासी पथक हे बारबोधन सुरत, राज्य गुजरात येथे रात्रीच्या वेळेस पोहचले सदर आरोपी लपलेले ठिकाण हे औध्योगिक वसाहत होते. पाहिजे आरोपीतां त्यांचे मोबाईल बंद करुन ठेवले होते. पोलीस पथकाने अतिशय मेहनतीने रात्रीच्या वेळेस प्राप्त असलेल्या छायाचित्रांवरुन एकुण ३७ कंपन्या तपासल्या. आरोपींनी आसरा घेतलेल्या घरमालकाचा कसोशीने शोध घेतला व गुन्हयातील एकुण ०५ आरोपीतांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत आणखी दोन पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने व ते पिथमपुर, इंदौर राज्य मध्यप्रदेश येथे लपुन असल्याचे माहिती मिळाली. तात्काळ एक पथक पिथमपुर, इंदौर राज्य मध्यप्रदेश येथे पाठवुन जंगलात लपुन बसलेले पाहिजे आरोपी नामे बंदी पाटीदार व प्रमोद हाटडीया यांना ताब्यात घेवुन अटक करून. आरोपीतांकडून खालील मालमत्ता हस्तगत करण्यात आली.

| | |
|---|---|
| हस्तगत दागिने व मोबाईल | १) ३५१.४१ ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचे दागिने<br>कि. १७,००,०००/—<br>२) अटक आरोपींचे ०७ मोबाईल हॅडसेट |
| हस्तगत हत्यार व दारूगोळा | १) एक लोखंडी धातुचे देशी बनावटीचे पिस्तुल व एकुण ४ नग पितळी जिवंत काडतुसे<br>२) ०३ रिकाम्या पुंगळया<br>३) ०१ बुलेटचा तुकडा |
| हस्तगत वाहने | १) एक करडया रंगाची होंडा सिटी मो. कार क्र.MH-01-AL-4323<br>२) एक काळया रंगाची ॲक्टीव्हा मो.स्कूटर क्र. MH-02-CS-4535 |
| हस्तगत कपडे | गुन्हा करताना परिधान केलेले कपडे<br>शुज, दागिन्यांचे रिकामे बॉक्स. वाहनांच्या चाव्या व कागदपत्रे |

गुन्हयाच्या तपासात एकुण १७ साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत तसेच ०३ प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी मा. न्यायाधीशांसमक्ष ओळख परेड घेतली. तसेच गुन्हयातील साक्षीदारांचे कलम १६४ सीआरपीसी प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले.

तसेच आरोपीतांनी गुन्हा करताना परिधान केलेले सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारे कपडे निष्पन्न करुन ताब्यात घेण्यात आलेले आहेत तसेच गुन्हयात जप्त केलेले मयताचे कपडे, रक्ताचे डाग, पुंगळया, पिस्तुल, मोबाईल फोन, शुज, पुढील तपासणीसाठी न्याय वैज्ञानिक प्रयोग शाळेत पाठविण्यात आले आहेत. आरोपींनी गुन्हा कसा केला हे पुराव्यानिशी निषपन्न करण्यासाठी आरोपीतास गुन्हा घडल्याचे ठिकाणी तसेच गुन्हा घडण्यापुर्वी व घडल्यानंतर केलेले मार्गक्रमण याचा ताळमेळ घालण्यासाठी त्यास प्रत्यक्ष नमुद ठिकांणावर घेवुन जावुन तसा पंचनामा करण्यात आला व गुन्हयाची कडी जुळविण्यात आली. आरोपीतांनी गुन्हयात वापरलेली वाहने सोडलेली ठिकाणे, फेकुन दिलेले दागिन्यांचे रिकामे बॉक्स, दागिने वाटून घेतलेले ठिकाण, गुन्हा करुन पळुन जाताना एटीएम मधुन पैसे काढल्याचे ठिकाण, मालमत्ता हस्तगत कोठुन केली, ०८ महत्वाचे सीसीटीव्ही फुटेजेस ताब्यात घेतले. तसेच इतर पुराव्यांचे निवेदन पंचनामे करण्यात आले. आरोपींनी गुन्हा करण्यासाठी इंदौर ते मुंबई पर्यंत ज्या ट्रव्हल्स मधुन प्रवास केला त्याबाबत सविस्तर तपास केला. आरोपींनी गुन्हयात वापरलेले मोबाईल फोन आणि संबधीत मोबाईलचा सीडीआर तपासुन आरोपी गुन्हा घडण्यापुर्वी, घडताना ते घटनास्थळी हजर होते हे निष्पन्न केले.

# दहिसर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. प्रविण गजानन पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | अनिल रामचंद्र आव्हाड, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | संजय सदाशिव मराठे, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस निरीक्षक | सुरेश नानाभाऊ रोकडे, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस निरीक्षक | विकास सर्जेराव लोकरे, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | डॉ. चंद्रकांत प्रल्हाद घार्गे | प्रशस्तीपत्रक |
| ७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | ओम सुरेशराव तोटावार, | प्रशस्तीपत्रक |
| ८ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | अभिनय धोंडीराम पवार, | प्रशस्तीपत्रक |
| ९ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | प्रविण नारायण निंबाळकर, | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक | सुनिल अमृता पोवार, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक | शिवाजी विठ्ठल देसाई, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पोलीस उप निरीक्षक | सिध्दार्थ तुकाराम दुधमल, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.३२३५५ | संतोष सिताराम परब, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.२९५०१ | रत्नाकर शिवाजी खडपे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. २९७११ | वनिल विठ्ठल गायकवाड, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.३०३८१ | प्रकाश लक्ष्मण माने | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र.९६०३२२ | नंदकिशोर लवु तावडे | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र.९६०६४५ | देवेंद्र धोंडु पांगे, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र.९६११६५ | संदेश पांडुरंग तटकरे, | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र.९७०७१९ | सुजित शशिकांत मोरे | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र. ९८०३०५ | प्रविण पांडुरंग झेंडे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र.९८०४२१ | शरीफ अब्दुल गनी शेख, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ना.क्र.९९०४१३ | सिध्दार्थ जगदीश किणी | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ना.क्र.०३.६७९ | भरत सिताराम मोहिते, | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.ना.क्र ०३०७५८ | विकास वासुदेव पोळ, | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.ना.क्र ०३१३४२ | निलेश नारायण सांबरेकर, | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.ना.क्र ०३११६७ | सचिन मनोहर केळजी, | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.ना.क्र ०६०६०९ | वैभव शिवाजी चिकणे, | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.ना.क्र ०६०६१० | शहानवाज यासिन सय्यद, | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.क्र ०९.२५२७ | चंद्रकांत रामदास शिरसाट | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.शि.क्र ०९०६२० | योगेश रत्नाकांत हिरेमठ, | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.शि.क्र ०९१७६० | विजय त्रिंबक लहांगे | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पोना. १८०८० | सागर सुरेश पवार | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक ०३/०९/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' BEST CONVICTION OF THE MONTH " माहे जुलै २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुन— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | माहिम पोलीस ठाणे<br>परिमंडळ—०५ | गु.र.क्र. ३१३/२०१६ कलम ३७६,५०६ (२), भादवि |

— : ''बलात्कार'': —

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** : — गुन्हयातील फिर्यादी श्री. आयवीन फिलीप डिकोना, वय ४८ वर्षे, यांचे सोबत माहे डिसेंबर २०१५ पासून त्यांची सावत्र मुलगी शोभा पुरूषोत्तम फुलवाणी, वय २२, ही फिटचा आजारावर उपचार करण्यासाठी रहावयास आहे. तिच्या लांबच्या नात्यातला इसम लाला मोहन पुरोबीया, याने माहे एप्रील २०१६ मध्ये तिला सोसायटी समोरील बाथरूममध्ये नेऊन '' **हम दोनो शादी करेंगे** '' असे बोलून हिच्यावर जोर जबरदस्तीने बलात्कार केला. तसेच तिला **''हि गोष्ट कोणाला सांगीतल्यास तुला व तुझ्या मुलीस ठार मारून टाकेन**'' अशी धमकी दिली.

दिनांक १६/०८/२०१६ रोजी फिर्यादीच्या मुलीस ( बळीत महिला) उलटया व चक्कर आल्याने फिर्यादीने तिला सायन रूग्णालयात उपचाराकरिता नेले असता तेथे तपासण्या झाल्यांनतर ती १८ ते २० आठवडयाची गरोदर असल्याचे डॉक्टरांकडून समजल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री आयवीन फिलीप डिकोना वय ४८, |
| बळीत | :— | शोभा पुरूषोत्तम फुलवाणी (डिकोना) वय २२, |
| निकाल दिनांक | :— | १०/०७/२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | लाला मोहन पुरोबीया वय २४, वर्षे<br>अटक दिनांक १८/०८/२०१६ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) कलम ३७६ भादवि १० वर्षे व ३०, हजार द्रव्यदंडाची शिक्षा व दंड न भरल्यास ०३ महिने शिक्षा अशी सजा सुनावण्यात आली<br>२) कलम ५०६ (२) भादंवी अन्वेय ०१ वर्षे सश्रम कारावास व रूपये १००००/—दंड/दंड न भरल्यास ०१ महिना सश्रम कारावासाची शिक्षा व दंडाच्या रक्कमेतील रू.३०,०००/—बळीत मुलीस देण्यास सांगितले अशी सुनावणी होण्याकरिता अथक परिश्रम घेतले.. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात केलेल्या डी.एन.ए तपासणीत बळीत मुलीच्या अर्भकाचे व आरोपीचे रक्ताचे नमुने एक असल्याचे (मॅच) निष्पन्न झाले. नमुद गुन्हयातील बळीत मुलगी हि मतिमंद असल्याचे वैदयकीय अहवालात निष्पन्न झाले. तिचा आय क्यु टेस्ट ३६ टक्के असल्याचा अहवाल प्राप्त करून नमुद अहवाल मा.न्यायालयात सादर केला. तसेच आरोपीतास जामीन मंजुर होऊ नये म्हणुन मा. न्यायालयात भक्कमपणे अहवाल सादर करण्यात आल्याने आरोपीचा जामीन अर्ज ०४ वेळा नामंजूर करण्यात आला.

मा. सत्र न्यायालयात खटला चालु असताना नमूद पथकाने सदर खटल्यातील पंच/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून पुन्हा घटनेचे वाचन करून योग्य मार्गदर्शन करून पंच/साक्षीदारांना वेळोवेळी प्रत्येक तारखेस मा. सत्र न्यायालयात हजर ठेवून वेळोवेळी घटनेची आठवण करून देण्यात आली व त्यानूसार मा.न्यायालयात भक्कमपणे साक्षीदारांनी साक्ष दिली.

माहिम पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | श्री मिलींद जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस उप निरीक्षक | श्री राजेंद्र शिवदे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | म.पोलीस उप निरीक्षक | श्रीमती अंजली वाणी. | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पो.शि.क्र.०९०३३३ | श्री रामदास नथ्थु भोई | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पो.शि.क्र. ११०७६३ | प्रकाश दादाराव सावंत | प्रशस्तीपत्रक |

टिप:— वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कफ परेड पोलीस ठाणे, व माहीम पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month July – 2021 व Best Conviction of the June 2021 या करीता निवड झाले नंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र ‘क’ प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे

# Best Detection of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |

| | | |
|---|---|---|
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, प्दुनमेज पंचनामा,घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.